**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरात सुरू असलेल्या जीएसटी बचत महोत्सवामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह असल्याचं प्रधानमंत्र्यांचं 'मन की बात' मध्ये प्रतिपादन

- फलटणमध्ये १ हजार ३५२ कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन आणि लोकार्पण

- छत्तीसगडमध्ये २१ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

- राष्ट्रीय विज्ञान पुरस्कारांमधे जयंत नारळीकर यांना मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार जाहीर /नागपूरच्या नीरीचे संचालक डॉ. एस. वेंकट मोहन, यांना ‘विज्ञान श्री’ पुरस्कार

**आणि**

- आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारत-बांगलादेश सामन्यात पावसाचा व्यत्यय

**<><><><><>**

देशभरात सध्या जीएसटी बचत महोत्सव सुरू असून यामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून त्यांनी देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १२७वा भाग होता. यंदाच्या सणासुदीच्या काळात स्वदेशी वस्तूंची खरेदी प्रचंड वाढली असल्याचं त्यांनी सांगितलं.

ऑपरेशन सिंदूरनं प्रत्येक भारतीयाला अभिमानानं भारून टाकलं आहे. कधीकाळी नक्षलवाद्यांची दहशत असलेल्या प्रदेशांमध्येही नक्षलवादाविरोधी कारवाईमुळं यंदाच्या सणात आनंदाचे दीप प्रज्वलित झाले, असं सांगून, नक्षलवादाचं समूळ उच्चाटन करायच्या ध्येयाचा पुनरुच्चार त्यांनी केला.

प्रधानमंत्र्यांनी देशवासीयांना छठ पूजेच्या शुभेच्छा दिल्या. संस्कृत भाषेचं महत्व आणि तिच्या संवर्धनासाठी होत असलेल्या प्रयत्नांची माहितीही त्यांनी दिली. यासाठी युवा वर्ग करत असलेल्या प्रयत्नांमुळे आनंद वाटत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

***होल्ड… MKB SANSKRIT***

स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाविषयीच्या अभिनव उपक्रमांबद्दल प्रधानमंत्र्यांनी माहिती दिली. सागरी परिसंस्थेच्या जतन संवर्धनासाठी खारफुटीचं महत्व त्यांनी अधोरेखित केलं. आपणही जिथं राहतो तिथं झाडं लावावीत, एक पेड़ माँ के नाम ही मोहीम आणखी पुढे न्यावी असं आवाहन त्यांनी केलं.

येत्या ३१ तारखेला लोहपुरुष सरदार पटेल यांच्या जयंतीदिनानिमित्त देशभरात आयोजित केल्या जाणाऱ्या 'रन फॉर युनिटी' मध्ये सहभागी होण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी केलं.

येत्या ७ नोव्हेंबर रोजी, वंदे मातरम्, या राष्ट्रीय गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाला प्रारंभ होणार आहे, यानिमित्त देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार आहे, त्यासाठी नागरिकांनी आपल्याला सूचना पाठवाव्यात असं आवाहनही त्यांनी केलं.

यापूर्वी आपण केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत सीमा सुरक्षा दल आणि केंद्रीय राखीव पोलीस दलानं पथकांमध्ये भारतीय वंशाच्या श्वानांची संख्या वाढवली, तसंच सीमा सुरक्षा दलानं श्वानांना भारतीय नावं द्यायची परंपरा सुरू केली आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकातल्या मुधोळ हाउंड, आणि उत्तर प्रदेशातल्या रामपूर हाउंड या जातीच्या श्वानांना प्रशिक्षण दिलं जात असल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली.

**<><><><><>**

२१वं शतक हे भारताचं आणि आसियानचं शतक आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. आसियान-भारत शिखर परिषदेला त्यांनी दूरस्थ पद्धतीनं संबोधित केलं. भारत आणि आसियान, हे संयुक्तरीत्या जगाच्या जवळपास एक चतुर्थांश लोकसंख्येचं प्रतिनिधित्व करतात, असं त्यांनी सांगितलं. या दोघांमधले संबंध फक्त भौगोलिक नाही, तर ऐतिहासिक आणि समान मूल्यांवर आधारित असून, जागतिक अस्थिरतेच्या काळातही त्यात सातत्यपूर्ण प्रगती झाल्याचं ते म्हणाले.

कोणत्याही आपत्तीच्या काळात भारत, आसियानच्या मित्रदेशांसोबत खंबीरपणे उभा राहिला असून मानवतेच्या दृष्टिकोनातून मदत आणि आपत्ती निवारण, सागरी सुरक्षा आणि ब्लू इकॉनॉमी क्षेत्रातलं परस्पर सहकार्य वेगानं वाढत असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हेही आसियान परिषदेत सहभागी होण्यासाठी आज मलेशियात पोहोचले. अमेरिकेचा आशियातला प्रभाव वाढवणं आणि स्थानिक भागीदार देशांशी व्यापारी संबंध पुनर्स्थापित करणं हा या पाच दिवसीय दौऱ्याचा उद्देश आहे.

भारताचे परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी आज आसियान परिषदेदरम्यान विविध जागतिक नेत्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.

दरम्यान, पूर्व तिमोर या देशानं ११वा सदस्य म्हणून आसियानमध्ये प्रवेश केला.

<><><><><>

नीरा देवघर प्रकल्पाच्या उजवा मुख्य कालवा दुसऱ्या टप्प्याच्या प्रारंभासह १ हजार ३५२ कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते आज फलटण इथं झालं. नीरा

देवघर प्रकल्पातल्या तीन उपसा सिंचन योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली जाईल, माळशिरस तालुक्यातल्या २२ गावांना पाणी पोहोचवलं जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येबद्दल दुःख व्यक्त केलं तसंच त्यांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्यांना शिक्षा होईल, असं आश्वासन दिलं.

<><><><><>

छत्तीसगडमध्ये कांकेर जिल्ह्यात आज २१ नक्षलवाद्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. यामध्ये १३ महिलांचा समावेश आहे. या नक्षलवाद्यांनी आपल्याकडच्या तीन एके-४७ रायफल, चार एसएलआर, इतर शस्त्र आणि स्फोटकं पोलिसांच्या ताब्यात दिली.

आत्मसमर्पण करणारे नक्षलवादी बस्तर विभागात विविध ठिकाणी दीर्घ काळ सक्रिय होते, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

<><><><><>

विज्ञान क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी दिले जाणारे राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार आज जाहीर झाले. त्यात जयंत नारळीकर यांना मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार घोषित झाला आहे. यंदा विज्ञान श्री पुरस्कारासाठी ८ शास्त्रज्ञांची निवड झाली आहे. त्यात नागपूरच्या नीरी, अर्थात राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेचे संचालक डॉ. एस. वेंकट मोहन यांचा समावेश आहे.

विज्ञान युवा श्रेणी अंतर्गत, विविध विषयांमध्ये १४ युवा शास्त्रज्ञांची निवड झाली आहे, तर कृषी विज्ञानामधल्या योगदानासाठीचा विज्ञान टीम पुरस्कार, 'टीम अरोमा मिशन सीएसआयआर' ला दिला जाईल.

<><><><><>

आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील मैदानावर  सुरु असलेल्या सामन्यात पावसानं व्यत्यय आणला आहे. मैदान

ओलं झाल्यानं हा सामना उशारा सुरु झाला. भारतानं नाणेफेक जिंकून बांगलादेशाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. विलंबामुळे हा सामना प्रथम, प्रत्येकी ४३ षटकांचा करण्यात आला. बांगला देशाच्या, तेराव्या षटकात २ बाद ३९ धावा झाल्या असताना पावसामुळे खेळ थांबवावा लागला. त्यामुळे आता हा सामना प्रत्येकी २७ षटकांचा केला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा बागला देशाच्या २१ षटकात ३ बाद ८७ धावा झाल्या होत्या.

<><><><>

भारतीय भारोत्तलनपटू प्रीतिस्मिता भोई हिनं बहरीनमधे आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत ४४ किलो वजनी गटात ९२ किलो वजन उचलत नवा विक्रम प्रस्थापित केला. या स्पर्धेत तिने एकूण १५८ किलो वजन उचललं असून तिच्या खात्यात सुवर्णपदक निश्चित झालं आहे.

<><><><>

चीनमध्ये चेंगडू इथं झालेल्या बॅडमिंटन एशिया अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं मुलींच्या कनिष्ठ गटात एकेरीमधली दोन सुवर्णपदकं, आणि एक रौप्य पदक पटकावलं.

१५ वर्षांखालच्या गटात शायना मणिमुथू हीनं जपानच्या चिहारू टोमिता हिला २१-१४, २२-२० असं नमवलं.

१७ वर्षांखालच्या गटात दीक्षा सुधाकर हीनं अंतिम फेरीत भारताच्याच लक्ष्या राजेश हिला २१-१६, २१-९ असं हरवून सुवर्णपदक जिंकलं. लक्ष्या हिला रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं.

<><><><>

चौथ्या दक्षिण आशियाई एथलेटिक स्पर्धेत अर्थात सॅफ मध्ये आज तिसऱ्या दिवशी भारतानं सहा देशांच्या पदकतालिकेत आघाडी घेतली आहे. आज स्पर्धेच्या

तिसऱ्या दिवशी भारतानं ६ सुवर्ण, ४ रौप्य आणि ९ कांस्य पदकं पटकावत अग्रस्थान मिळवलं. भारतीय खेळाडूंनी आज अनेक विक्रमही मोडीत काढले. भारतानं या स्पर्धेत आतापर्यंत एकूण ५१ पदकं जिंकली असून त्यात १८ सुवर्ण, १८ रौप्य आणि १५ कांस्य पदकांचा समावेश आहे.

**<><><><><>**

भारताची सृष्टी किरण हिनं डॉमिनिकन रिपब्लिक मधल्या कॅबारेते इथं झालेल्या आंतरराष्ट्रीय टेनिस महासंघाच्या जे थर्टी या स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं आहे. या विजेतपदासह तिनं कनिष्ठ गटातलं पहिलं आंतरराष्ट्रीय विजेतेपद आपल्या नावे केलं आहे.

सृष्टी हीनं अंतिम फेरीत व्हेनेझुएलाच्या स्टेफनी पुमार हिचा ६-२, ६-२ असा सरळ सेटमध्ये पराभव केला.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या मुंबईत इंडिया मॅरिटाईम वीक या पाच दिवसीय परिषदेचं उद्घाटन करणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यावेळी उपस्थित असतील.

याशिवाय, अमित शहा उद्या माझगांव गोदीत खोल समुद्रात मासेमारी करण्याच्या विशेष नौकांच्या चाव्या लाभार्थ्यांना सुपूर्द करणार आहेत.

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरात आग्नेयेकडे निर्माण झालेला कमी दाबाचा पट्टा उद्यापर्यंत आणखी वायव्य दिशेला सरकेल, आणि येत्या मंगळवारपर्यंत त्याचं तीव्र चक्रीवादळात रूपांतर होईल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. हे चक्रीवादळ मछलीपट्टणम आणि कलिंगपट्टणम दरम्यान काकीनाडा जवळ आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यावर धडकण्याची शक्यता आहे. त्याच्या प्रभावामुळे पुढले दोन ते चार

दिवस पश्चिम बंगालचा गंगेच्या खोऱ्यातला प्रदेश, आंध्र प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड आणि ओदिशाच्या किनारपट्टी भागात मुसळधार पाऊस पडेल आणि जोरदार वारे वाहतील असा अंदाज आहे.

या भागातल्या मच्छिमारांनी येत्या २९ ऑक्टोबर पर्यंत खोल समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये, तसंच मासेमारीसाठी गेलेल्या मच्छिमारांनी ताबडतोब माघारी यावं, असा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**//<><><><><>//**